# अवकाश खेळ




**गॅलेक्सी एक्सप्रेस**

**अवकाशकालीन बायबल शाळा**

खेळासाठी पत्रके


# खेळ



### खेळ पर्याय, दिवस 1


## शब्द तयार करा

प्रत्येक टीममधून तीन मुले घ्या, मुले मंचावर उभी राहतील, आणि आपल्या शरीरांचा उपयोग करून दिलेल्या तीन अक्षरी शब्दांचे उच्चारण करतील. हा खेळ अनेकदा खेळावा, आणि प्रत्येक टीमने स्पर्धेत भाग घ्यावा.
जेव्हा पुढारी म्हणतो जा, तेव्हा पुढारी पहिला शब्द एका टीमला हळूच सांगतो आणि न बोलता ते आपल्या शरीरांनी शब्द तयार करतात. केवळ त्या टीमचे श्रोते अंदाज लावतात. त्यांचे बरोबर असले की घड्याळ थांबते आणि पुढारी या गोष्टीची नोंद करतो की त्यांचा टीमला योग्य शब्दाचा अंदाज लावण्यासाठी किती वेळ लागला.
मुले विरूध्द मुली, उदाहरणासाठी मुलींना एक शब्द मिळेल, आणि 3 मुली मंचावर त्यांच्या शरीराचा उपयोग करून शब्द/वस्तू तयार करतील, श्रोत्यांमधल्या केवळ मुलींनी तो शब्द कोणता आहे हे ओळखण्यासाठी अंदाज लावावा. जर मुलांनी भाग घेतला तर ते मुलींना जिंकण्यासाठी मदत करतील. काही 3 अक्षरी शब्द आहेतः कुत्रा, मांजर, टोपी, सूर्य, डुक्कर, मजा, जेट इ.



## चाखून पाहण्याची चाचणी


प्रत्येक टीमच्या एका मुलाला मंचवर येण्याचे आमंत्रण द्यावे. वेगवेगळ्या चवीचे आणि घडवणीचे वेगवेगळे अन्न तयार करा. प्रत्येकापासून हे अन्न लपवून ठेवा, आणि पुढे येणाऱ्या प्रत्येक मुलाच्या डोळ्यावर पट्टी बांधा. मंचावरील विद्यार्थ्यांस एकावेळी एक प्रकारचे अन्न चवीसाठी द्या आणि प्रत्येकाने ते ओळखावे. बाकीच्या विद्यार्थ्यांनी जे काही दिसते त्याचा उल्लेख करता कामा नये म्हणजे हा खेळ आणखी आव्हानात्मक ठरेल. (तुमच्या मुलांनी उत्तरे देता कामा नये!) प्रत्येक विद्यार्थ्याजवळ उत्तर देण्याची एक संधी आहे, त्यांना ओळखण्यासाठी केवळ दहा मिनिटे द्या. जागा स्वच्छ करण्यासाठी टॉवेल किंवा नेपकिन उपलब्ध ठेवा. मंचावरील मुलांनी वेगवेगळ्या अन्नपदार्थांचा अंदाज लावावा. जी टीम जास्तीत जास्त अन्नपदार्थ ओळखेल ती टीम विजयी ठरेल.



### खेळ पर्याय, दिवस 2


## पिण्याची रिले रेस

प्रत्येक संघासाठी 3 मुलांचा उपयोग करा, रेषा तयार करा. खोलीच्या दुस-या बाजूला प्रत्येक संघासाठी एक टेबल व त्यावर पाण्याची बाटली/जग ठेवा. भाग घेणा-या प्रत्येक मुलाला एक कागदी कप द्या . संघातील पहिला मुलगा किंवा मुलगी टेबलकडे धावत जाईल आणि पुढारी शिट्टी वाजवे पर्यंत पाणी पिण्यास सुरवात करेल. ते परत धावत येतात आणि पुढील मुलगा धावत जातो आणि पाणी पिण्यास सुरवात करतो इ. ज्या संघाकडे बाटलीत सर्वात कमी पाणी उरेल किंवा जो संघ सर्वात आधी पाणी संपवेल तो संघ जिंकेल!



## केळ खाण्याची शर्यत


प्रत्येक टीमचे प्रतिनिधित्व करण्यासाठी एका मुलाची निवड करावी, केवळ केळ सोलून खाणे. समस्या ही आहे की एक हात नेहमी त्यांच्या पाठीमागे असावा. जेव्हा पुढारी म्हणतो, “जा,” तेव्हा मुलाने एका हाताने आणि आपल्या दाताने अगदी चांगल्या प्रकारे केळ सोलण्याचा प्रयत्न करावा. केळ सोलल्यानंतर त्याने लगेच जिंकण्यासाठी पूर्ण केळ खाऊन टाकावे.



### खेळ पर्याय, दिवस 3


## खळखळ /मजाकी आवाजाचा प्रभाव

खळखळ /मजाकी आवाजाचा प्रभाव.
ठरल्या वेळेत नेता आवाजांचे प्रभांवाची सुची बनविल रू
1- खोकला 2. उचकी 3. कंकोष 4. छींक 5. हातांची टाळी 6. जंभाई 7. मूर्खा सारखे हॅसने / खळखळीत हसने 8. पायाना ठप्प ठप्पवा 9.कंठाला गरारे करणे.
सहा खेळाडुंची रांग बनवा, प्रत्येक संघा मधून तीन खेडाळू, त्यांना एका नंतर एक पाठवा, सर्व खेळाडूना सुचना दया कि ते एक दुसत्यांच्या आवाजांची नकल करेल. सुचीवर पहिला आवाज बनवा. रांगेच्या खाली जा, प्रत्येक खेळाडू व्यक्तीगत आवाज काढेल. नंतर पहिला आणि दुसरा आवाज काढा आणि सर्व खेळांडूना पण तसेच आवाज करायचे आहे. नंतर तिसरा आवाज पण काढा आणि तसेच करा. जर खेडाळू आवाज काढू षकला नाही, आवाज विसरुन गेला किंवा त्यांने उलटया क्रमानुसार केलं ; त्या खेळाडुला बाहेर काढण्यात येईल. जोपर्यंत एक खेळाडु राहत नाही तोपर्यंत आवाज काढत राहा .जो षेवटी पयंर्त राहेल त्यांचा संघ विजेता होईल।



## चिपकलेले डोक


एका व्यक्तीच्या डोकाला आणि गालाला चिकट टेप चिकवून घ्या (चिकटलेला भाग बाहेरच्या बाजुला). टेबलावर पेपरच्या पटटया फेकुन टाका. टेबलाच्या मागे उभे राहतांना खेळाडुने हाथ मागे घ्यावे, जेव्हा ते दर्षकांना समोर राहिल. जेव्हा तुम्ही बोलाल, ”जा“ सर्व खेळाळू आपले डोके टेबलावर घुमवेल, प्रयत्न करेल कि जास्तीत जास्त पट्टया त्यांच्या डोक्याला चिपकेल. षेवटचा मिनटाला ज्याच्या डोक्याला जास्त पट्टया असणार तो विजेता होईल.
(जर मुलाचे केस लांब असेल, खिचलेल्या केसांचे दुख दुर करण्यासाठी चिकट पट्टी लावण्याच्या अगोदर त्याचे केस मागे खिचून घ्या)



### खेळ पर्याय, दिवस 4


## कागदी युध्द

प्रत्येक संघातून एक असे दोन मुले भाग घेतील. मुले (2” बाय 6”) च्या लाकडी तुकडयावर उभे राहतील. दुस-या व्यक्तिच्या डोक्यावर न मारता, तलवार म्हणून गुंडाळलेल्या वर्तमान पत्राचा उपयोग करून मुलांना लाकडावरून खाली पाडावे. खेळाडूचा पाय जमीनीला लागताच तो बाद होईल. उरलेल्या खेळाडूंना जिकायचे असेल तर त्यांना लाकडी फळी वर त्यांचा तोल सांभाळावा लागेल. लाकूड ज्यास्त वर ठेऊ नका, म्हणजे मुलांना दुखापत होणार नाही. गुंडाळलेल्या वर्तमान पत्राच्या ऐवजी दुसरी काही मऊ वस्तू जी धोकादायक नसेल ती वापरू शकता.



## पिरामिड बनवा


5 मुलांना प्रत्येकी 10 कागदी कप द्या आणि त्यांना एका टेबलावर उभे करा. एका हाताचा उपयोग करून प्रत्येक मुलाने कपांचा पिरामिड तयार करावा. जो सर्व प्रथम तयार करेल तो जिंकेल!



खेळ पर्याय, दिवस 5


## लघुग्रह पकड

चुरगळलेल्या कागदापासून 20“लघुग्रह” तयार करा. 5 मुलांचे संघ खेळण्यासाठी येतील. एका मुलाची निवड खूर्ची किंवा मंचावर हातात एका वाटीत लघुग्रह सुरक्षित पकडून उभे राहण्यासाठी करा. इतर 4 मुलांनी खूर्ची/मंचापासून काही अंतरावर जमिनीवर बसावे, त्यांच्या डोक्यावर मध्यम आकाराच्या वाटया हळूवार पणे आजूबाजेला हालवत. प्रत्येक मुलाला लघुग्रहापासून त्यांच्या डोळयाचे संरक्षण करण्यासाठी एक चश्मा द्या ! लघूग्रह पकडून उभा असलेल्या मुलाने विशिष्ट वेळेत कादाचीत 30 सेकंड किंवा 1 मिनिट ते फेकावे जेणे करून शक्य तितके वाटयांमध्ये पडतील. किती लघुग्रह पकडले गेले त्याची नोंद करा आणि इतर संघा सोबत खेळाची पुनरावृत्ती करा. ज्या संघाच्या वाटयांमध्ये अधिक ग्रह आले तो विजेता राहील. हा खेळ अधिक कठिण करण्यासाठी - खूर्ची/मंचावरील मुलाच्या डोळयाला पट्टी बांधावी, परंतू प्रौढ व्यक्तिने खात्री करावी की मुल खूर्ची/मंचावरून खाली पडणार नाही!



## केक रिले

या खेळाची कल्पना अशी आहे की प्रत्येक संघातील दोन मुलांनी शक्य तिक्या लवकर एक केक सजवावा जे पाहण्यासाठी प्रेक्षकांना मजा येईल. वेळेआधी दोन केक तयार करा जे सजविलेले नाहीत. एप्रन, आयसिंग,काही सु-या, काही रंगीत बॉल किंवा केक सजविण्यासाठी इतर प्रकार द्या . जेव्हा पुढारी सुरू करा असे म्हणतो, तेव्हा मुले एप्रन घालतात आणि केकवर आयसिंग लावतात, त्याला सजवितात व पटकन त्या केकचा एक घास खातात. जो संघ सर्व प्रथम करेल तो विजेता ठरेल. बोनस म्हणून तुमच्या व्हीबीएसच्या शेवटी सर्व मुलांसाठी पुरेल एवढा केक पुरवा!



13657

www.ChildrenAreImportant.com
info@childrenareimportant.com

Equip & Grow
मुले महत्वपूर्ण आहेत